॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जळगाव दि. ४ (प्रतिनीधी) : लुधियाना येथील पंजाब कृषी विद्यापीठात झालेल्या ३७ व्या आंतर विद्यापीठीय राष्ट्रीय युवक महोत्सवात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला ललित कला प्रकारात दोन सुवर्ण, एक कास्य पदक प्राप्त झाले. याशिवाय सांस्कृतिक पथसंचलनात चौथ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

लुधियाना येथे राष्ट्रीय युवक महोत्सव नुकताच पार पडला. ललित कला प्रकारात क्ले मॉडेलिंग मध्ये देवा सपकाळे या विद्यार्थ्याला सुवर्णपदक प्राप्त झाले. इन्स्टॉलेशन मध्ये देखील सुवर्ण पदक मिळाले. यामध्ये देवा सपकाळे, तौसिफ शेख आणि माधुरी बडगुजर हे विद्यार्थी सहभागी होते. स्पॉट फोटोग्रॉफी मध्ये समय चौधरी या विद्यार्थ्याला कास्य पदक प्राप्त झाले. विद्यापीठाच्या संघाला सांस्कृतिक पथसंचलनात चौथ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. हे सर्व विद्यार्थी जळगावच्या मुळजी जेठा महाविद्यालयातील कान्ह ललित कला केंद्राचे विद्यार्थी आहेत. या संघासोबत संघव्यवस्थापक म्हणून डॉ. योगिता चौधरी (गरूड महाविद्यालय, शेंदुर्णी) व प्रा. पियुष बडगुजर (मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव) हे सहभागी होते. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, के.सी.ई. संस्थेचे अध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य नंदकुमार बेंडाळे, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे तसेच शशिकांत वडोदकर, प्राचार्य स.ना. भारंबे यांनी अभिनंदन केले.

**बातमी नं. २**

जळगाव दि. ४ (प्रतिनीधी) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्यामार्फत रविवार दि. ७ एप्रिल रोजी ३९ वी राज्य पात्रता चाचणी परीक्षा (सेट) जळगाव केंद्रावर होणार असून या परीक्षेसाठी ३ हजार ७३० विद्यार्थी बसले आहेत.

जळगाव शहरातील ८ केंद्रावर सेट परीक्षा होणार आहे. अशी माहिती कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलसचिव तथा या परीक्षेचे समन्वयक डॉ. विनोद पाटील यांनी दिली. परीक्षा केंद्र पुढील प्रमाणे १) मु.जे. महाविद्यालयातील स्वामी विवेकानंद भवन – अ (केंद्र क्रमांक १४०१), २) स्वामी विवेकानंद भवन – ब (केंद्र क्रमांक १४०२), ३) स्वामी विवेकानंद भवन – क (केंद्र क्रमांक १४०३), ४) के.सी.ई. शिक्षणशास्त्र महाविद्यालय (केंद्र क्रमांक १४०४), ५) ए.टी. झांबरे महाविद्यालय – अ (केंद्र क्रमांक १४०५), ६) ए.टी. झांबरे महाविद्यालय – ब (केंद्र क्रमांक १४०६), ७) के.सी.ई.चे इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर (केंद्र क्रमांक १४०७), ८) के.सी.ई.चे अभियांत्रिकी महाविद्यालय (केंद्र क्रमांक १४०८).

या परीक्षेसाठी प्रवेशपत्र setexam.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यावर दिलेल्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्र डाऊनलोड करावे. अर्ज भरतांना वापरलेला लॉग इन व पासवर्डचा वापर करावा असेही आवाहन करण्यात आले आहे.

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- ४ एप्रिल, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ. सुनील पाटील
(जनसंपर्क अधिकारी)